दिनांक 02/11/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्रं.163

विषय –विटा नगरपरिषद हद्दीतील घरोघरी जावून घंटागाडीव्दारे ओला, सुका व घातक कचरा वेगवेगळा संकलन करणे, रस्ते, सार्वजनिक व सामुदायिक शौचालये, मुता-या तसेच गटर यांची दैनंदिन साफसफाई करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 16/10/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) घनकचरा व्यवस्थापन नियम, 2016.

3) सन 2022-23 करिता श्री. गजानन निकम यांना दिलेली वर्क ऑर्डर, दि.05/12/2022.

4) सन 2022-23 करिता श्री. गजानन निकम यांचे सोबत केलेले करारपत्र

विटा नगर परिषद ही "ब" वर्ग नगर परिषद असून शहराची लोकसंख्या 2011 च्या जनगणनेनुसार 48,289 आहे. सध्याची लोकसंख्या अंदाजे 60,000 आहे. शहरात अंदाजे एकूण 18,000 मिळकती आहेत. विटा नगरपरिषदेने स्वच्छ सर्वेक्षण 2021 मध्ये 50 हजारांपेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या शहरांच्या गटात देशात पहिला क्रमांक पटकावला आहे. सध्या नगरपरिषदेकडे 19 घंटागाड्या व 2 ट्रॅक्टर आहेत. सदर गाड्यांद्वारे शहरातील एकूण 38 रूट मधून दर दिवशी सरासरी एकूण 22 टन एवढा कचरा संकलित केला जातो. सदर संकलित कचऱ्यापैकी 10 टन एवढा ओला कचरा व 12 टन एवढा सुका कचरा असतो. सदर कचरा घनकचरा व्यवस्थापन केंद्र (शहरापासून 5 किमी दूर ) येथे वाहतूक करून नेला जातो. सदर सर्व कच-यावर घनकचरा व्यवस्थापन केंद्र येथे प्रक्रिया केली जाते.

विटा शहराचे क्षेत्रफळ 55.15 चौ.कि.मी. असून शहर हद्दीत अंदाजे 125 कि.मी. लांबीचे रस्ते 118 कि.मी. लांबीची गटर, 18 सार्वजनिक शौचालये आहेत. सदर सार्वजनिक व सामुदायिक शौचालये, मुता-या तसेच गटर व रस्ते यांची दैनंदिन साफसफाई केली जाते.

वरील सर्व कामे निविदा काढून करण्यात येतात. मागील वर्षी सदर ठेका हा श्री गजानन निकम यांना मंजूर झाला होता. त्याची रक्कम 2.37.88.998/- एवढी होती. संदर्भ क्रं. 4 प्रमाणे त्यांचेसोबत करारनामा करण्यात आला होता. संदर्भ क्रं.3 नुसार त्यांना दि.05/12/2022 रोजी कार्यादेश देण्यात आला होता. त्यानुसार सध्या काम सुरु आहे.

सदर कामाची मुदत दि.05 डिसेंबर 2023 पर्यंत असून त्यापुढे नवीन प्रस्तावास मान्यता न घेतलेस सदरचा खर्च हा नगरपरिषद फंडातून करावा लागू शकतो व शहराची साफसफाई करण्यास अडचण निर्माण होऊ शकते.

पान नं.2 वर

तरी सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करणे, तांत्रिक मान्यता घेणे, प्रशासकीय मान्यता घेणे, निविदा  प्रक्रिया राबविणे कामी विलंब लागणार आहे. तरी सदरचे काम स्वच्छ सर्वेक्षणमध्ये उच्चतम कामगिरी करणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना देण्यात येणाऱ्या प्रोत्साहनात्मक बक्षीस रक्कम अंतर्गत करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-

( डॉ. विक्रम बांदल )

प्रशासक

विटा नगरपरिषद विटा

दिनांक 02 /11/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्रं.164

विषय – नगरपरिषदेकडील आर्किटेक्ट नेमणूकीबाबत सन 2023-24 या वित्तीय वर्षाकरीता मुदतवाढ मिळणेबाबत श्री.विठ्ठल पाचकवडे व श्री. चंद्रकांत पाटील यांचे दाखल दिनांक 12/07/2023 व दिनांक 19/06/2023 रोजीचे अर्जावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी नगरअभियंता यांची दिनांक 01/11/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेकडील विविध योजनांमधील विकास कामांचे परिपुर्ण प्रस्ताव व अंदाजपत्रके तयार करणे त्यास तांत्रिक मान्यता घेणे इत्यादी कामे करणेकरिता आर्किटेक्ट यांची नेमणूक करणे आवश्यक असते .नगरपरिषदेने सन 2021-22 करीता ई निविदेने श्री. विठठल पाचकवडे व श्री. चंद्रकांत पाटील या दोन आर्किटेक्ट यांची नेमणूक स्थायी समिती सभा ठराव क्र 218 दि. 30/10/2021 अन्वये कामे करणेकरीता मंजूरी दिलेली आहे. तसेच सन 2022-23 करीता श्री. विठठल पाचकवडे व श्री. चंद्रकांत पाटील या दोन आर्किटेक्ट यांची नेमणूक प्रशासकीय ठराव क्र. 26 दि. 02/08/2022 ने सन 2022-23 करीता मुदतवाढ घेतलेली आहे. त्यांची मुदत दि.31/03/2023 रोजी संपलेली आहे. तरी श्री. विठ्ठल पाचकवडे व श्री. चंद्रकांत पाटील यांनी सन 2023-24 या वित्तीय वर्षाकरीता पाठीमागील सन 2022-23 दरानेच काम करीत असलेबाबत विनंती अर्ज दिलेले आहे. तरी त्यांना सन 2023-24 या वित्तीय वर्षाकरीता तसेच यापुढील निविदा प्रकिया होईपर्यंत मुदतवाढ देणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ. विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 02 /11/2023 रोजीचा प्रशासकीय ठराव क्र.165

विषय - विटा नगरपरिषेची चतुर्थ वार्षिक कर आकारणी करणेस एजन्सी नेमणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ - मा.मुख्याधिकारी यांनी कर अधिक्षक यांची दिनांक 02/11/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 124 (2) नुसार चतुर्थ वार्षिक करआकारणी करणेची तरतूद आहे. त्याप्रमाणे यापूर्वी सन 2018-19 ते 2021-22 अखेर या आर्थिक वर्षासाठी नगरपरिषदेने करपात्र मुल्यामध्ये वरील नियमानुसार सुधारणा केलेली होती.सध्या कर विभागाकडे अपुरे मुनष्यबळ असल्यामुळे सदरची चतुर्थ वार्षिक कर आकारणी त्रयस्थ एजन्सीमार्फत करणे गरजेचे आहे. चतुर्थ वार्षिक करआकारणी केल्यामुळे नगरपरिषदेच्या आर्थिक उत्पन्नात भर पडणार आहे. याकामी अंदाजे 1 कोटी 25 लक्ष इतकी रक्कम खर्च होणे अपेक्षित आहे. तरी विटा नगरपरिषेची चतुर्थ वार्षिक कर आकारणी करणेकामी एजन्सी नेमणेस मंजूरी देत आहे. यासाठी येणारा खर्च 14 व्या वित्त आयोगाच्या व्याजाची रक्कम तसेच उर्वरित खर्च नगरपरिषद फंडातून करणेत यावा. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-

( डॉ. विक्रम बांदल )

प्रशासक

विटा नगरपरिषद विटा

दिनांक 02 /11/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.166

विषय – विटा नगरपरिषदेकडील सन 2023-24 या वित्तीय वर्षाकरीता स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधराचे अनुषंगाने शहरामध्ये विविध ठिकाणच्या पिण्याच्या पाण्याच्या टाक्या,शौचालय, सार्वजनिक ठिकाणचे रंगकाम करणे, अक्षरे लिहणे, चित्रे काढणे, आवश्यक ठिकाणी पायाड उभारणे, न.पा.मालकीच्या इमारतीस व इतर ठिकाणी रंगरंगोटी करणेकामी दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी आरोग्य निरिक्षक यांची दिनांक 01/11/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेकडील सन 2023-24 या वित्तीय वर्षाकरीता स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधराचे अनुषंगाने शहरामध्ये विविध ठिकाणच्या पिण्याच्या पाण्याच्या टाक्या, शौचालय, सार्वजनिक ठिकाणचे रंगकाम करणे, अक्षरे लिहणे, चित्रे काढणे, आवश्यक ठिकाणी पायाड उभारणे, न.पा.मालकीच्या इमारतीस व इतर ठिकाणी रंगरंगोटी करणेकामी खालील निविदा दाखल आहेत.

1) वैभव आर्टस, विटा

2) दिनेश एन्टरप्रायजेस, विटा

3) अयान इंटरप्रायजेस, विटा

उपरोक्त निविदापैकी वैभव आर्टस, विटा यांचे निविदेतील दर सर्व प्रकारात सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 02 /11/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.167

विषय – स्वच्छ सर्वेक्षण कामी citizen engagement citizen impact वाढविणेसंबंधी विविध प्रकारची कामे करणे, त्यासंबंधी डॉक्युमेंट तयार करणे व सादर करणेकरीता संस्था नियुक्त करणेकामी दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी आरोग्य निरिक्षक यांची दिनांक 02/11/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

स्वच्छ सर्वेक्षण कामी citizen engagement citizen impact वाढविणेसंबंधी विविध प्रकारची कामे करणे, त्यासंबंधी डॉक्युमेंट तयार करणे व सादर करणेकरीता संस्था नियुक्त करणेकामी खालील निविदा दाखल आहेत.

1) दिव्यस्वप्न फांऊडेशन, कोल्हापूर

2) आय स्मार्ट टेक्नो सोल्युशन , विटा

3) अनंत इंटरप्रायजेस, जरंडी सांगली

उपरोक्त निविदापैकी दिव्यस्वप्न फांऊडेशन, कोल्हापूर यांचे निविदेतील दर सर्व प्रकारात सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा